मा. कामगार न्यायालय, भंडारा येथे दाखल अर्ज पी.जी.ए. क्र. १८५/२०२२, १८६/२०२२ व १८७/२०२२ मधील न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने रोजंदारी मजुरांना उपदान थकबाकी व व्याजाची रक्कम अदा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : न्यायप्र-२०२६/प्र.क्र.१५१/१३-अे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- १५ जुलै, २०२६

वाचा:- कृषी आयुक्तालय, पुणे यांचे पत्र जा.क्र. आस्थ-३/भंडारा/पीजीए/२०२६ दिनांक ०६.०५.२०२६.

प्रस्तावना:-

भंडारा येथील जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या अधिनस्त असलेल्या तालुका फळरोपवाटिका, भंडारा येथे रोजंदारी तत्त्वावर कार्यरत असलेल्या श्रीमती सत्यभामा राघोजी गभणे, श्रीमती विमल शंकर निर्वाण व श्रीमती सरस्वती भोजराज सेलोकर या रोजंदारी मजुरांना उपदानाची (Gratuity) रक्कम मिळण्यासाठी मा. कामगार न्यायालय, भंडारा येथे अर्ज दाखल केले होते. सदर प्रकरणी मा. कामगार न्यायालयाने दिनांक ०९.०५.२०२४ रोजी मजुरांच्या बाजूने निर्णय देत मूळ उपदान रक्कमेवर १०% वार्षिक सरळव्याजासह आणि दंडात्मक खर्चासह रक्कम अदा करण्याचे आदेश दिले होते.

सदर आदेशाच्या अनुषंगाने विधी व न्याय विभागाने दिलेल्या कायदेशीर अभिप्रायानुसार सदर प्रकरणात वरिष्ठ न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यास सबळ आधार नसल्याने न्यायालयीन आदेशाचे अनुपालन करण्याचा सल्ला दिला आहे. तदनुसार, मजुरांना देय मूळ उपदान रक्कम (रु. ३,३७,०८०/-), १०% सरळव्याज (रु. ३,२२,७१६/-) आणि दंडाची रक्कम (रु. १५,०००/-) यासह एकूण रु. ६,७४,७९६/- (अक्षरी सहा लाख चौऱ्याहत्तर हजार सातशे शहाण्णव मात्र) इतकी रक्कम परिगणित व प्रमाणित करण्यात आली असून, सदर थकबाकी अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

मा. कामगार न्यायालय, भंडारा यांच्या दिनांक ०९.०५.२०२४ रोजीच्या न्यायनिर्णयाची व दिनांक २९.०४.२०२६ रोजीच्या वसुली आदेशाची अंमलबजावणी करण्याकरीता, तालुका फळरोपवाटिका, भंडारा येथील एकुण ०३ रोजंदारी मजूरांना उपदानाची मूळ रक्कम, व्याज व दंडात्मक खर्चासह एकूण रूपये ६,७४,७९६/- (रुपये सहा लाख चौऱ्याहत्तर हजार सातशे शहाण्णव फक्त) थकबाकी रक्कम अदा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर प्रकरणी थकबाकी रक्कमेची परिगणना मा. न्यायालयाच्या आदेशानुसार बरोबर असल्याची खात्री जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, भंडारा व कृषि आयुक्तालयाने करण्याच्या अटीवर सदरची मान्यता देण्यात येत आहे. हा खर्च खालील नमूद केलेल्या लेखाशीर्षामधून सन २०२६-२७ या चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा:

| अ.क्र. | आहरण व संवितरण अधिकारी (DDO) / प्रक्षेत्र | लेखाशीर्ष व मागणी क्रमांक | मजूरांची संख्या | वितरित करण्यात येणारा एकूण निधी (व्याज व फरकासह) |
|---|---|---|---|---|
| १ | उपविभागीय कृषि अधिकारी, भंडारा (तालुका फळरोपवाटिका, भंडारा) | मागणी क्र. डी-३ (०३)-रोपमळे (०३) (०१) भाजीपाला रोपमळे, स्थानिक उद्याने<br><br>लेखाशीर्ष: २४०१-१७२२ (०२ मजुरी/उपदान) | ०३ मजूर | रु. ६,७४,७९६/- |

२. या प्रकरणी संबंधित मजुरांना तातडीने रक्कम आहरित करून वितरित करण्यासाठी उपविभागीय कृषि अधिकारी, भंडारा यांना आहरण व संवितरणाचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत आणि विभागीय कृषि सहसंचालक, नागपूर यांना सनियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिकेमध्ये उल्लेख केलेल्या तसेच नियोजन व वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व प्रचलित निकष, वित्तीय अधिकाराचे प्रत्यायोजन तसेच वित्त विभागाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे व न्यायालयाच्या कालमर्यादेचे काटेकोरपणे पालन करावे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाने शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६ आणि दिनांक ०७.०५.२०२६ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७१५१२२९०८२९४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

LALITKUMAR
RANGNATH DHAYGUDE

Digitally signed by LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept,
2.5.4.20=77EE43FEB646B7AE43865425CA1D67A75CD7607FAEAE62A4E9BAD488155D6D28, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=84E88A84C7D5FA8833BA5D3A151CAF394D94599C220A07BDD761A398EED0AC3E, cn=LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
Date: 2026.07.15 12:29:57 +05'30'

**( डॉ. ललितकुमार रं. धायगुडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. विभागीय कृषि सहसंचालक, नागपूर.
३. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, भंडारा.
४. उपविभागीय कृषि अधिकारी, भंडारा.
५. महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, भंडारा.
७. वित्त विभाग (व्यय-१), मंत्रालय, मुंबई.
८. विधी व न्याय विभाग, नागपूर खंडपीठ.
९. निवड नस्ती (कार्यासन १३-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.